# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३

## (सकाळी ११-०० ते ११-३० वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (३) ] —**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक भागात आरक्षण समर्थनार्थ दीर्घ काळापासून सुरु झालेली तीव्र स्वरुपाची आंदोलने, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरु असणे, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती स्फोटक होण्याचा निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरु रहावी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाप्रमाणे मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे वांद्रे, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथील खार-सांताक्रुज येथील केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागेवर ५० वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टी धारकांचा पुनर्विकास रखडलेला असणे, याबाबत विविध आयुधांद्वारे लक्ष वेधून देखील कार्यवाही होत नसणे, सदर जागेबाबत संरक्षण मंत्री भारत सरकार व मा. मुख्यमंत्री यांच्यात २०१७ साली झालेल्या बैठकीत ५०% जागा केंद्र सरकारच्या संरक्षण विभागास तर ५०% जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत तेथील झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास करण्याचे प्राथमिक धोरण निश्चित झालेले असणे, तसेच सदर पुनर्विकासाठी केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाची बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यास हरकत नसणे, तत्कालीन सरकारने याबाबत त्रिसदस्यीय समिती गठीत न करणे परंतु सदर झोपडपट्टीच्या लगत असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील तसेच

अप्रकाशित

खाजगी मालकीच्या जागेवर पुनर्विकास करण्यास मंजुरी देणे, परंतु संरक्षण विभागाच्या मालकीवरील पुनर्विकासाबाबत आजतागायत अतिशय संथगतीने सुरु असलेल्या कार्यवाहीमुळे तेथील नागरिकांमध्ये असलेल्या असंतोषाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची भूमिका."

(३) **सर्वश्री विक्रम काळे,** शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, अनिकेत तटकरे, नरेंद्र दराडे, सचिन अहिर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी नाशिक येथील गोंदे औद्योगिक वसाहतीतील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीत बॉयलरजवळ स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत दोन महिला कामगारांचा दुदैवी मृत्यु झाल्याचे तसेच अन्य १७ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे आढळून येणे, त्यानंतर सदर दुर्घटनेच्या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांनी भेट देऊन पाहणी केल्यानंतर, त्याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देऊन त्याचवेळी मृतांच्या वारसास पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे मुख्यमंत्री महोदयांनी घोषित करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, शासनाने आदेशित केल्यानुसार, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालात काय नमूद करण्यांत आले आहे व त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली याबाबतची अद्यापही अनभिज्ञता असणे, तसेच कामगार आयुक्तांच्या पथकाने या कंपनीस दर महिन्यास भेट देऊन पाहणी करणे बंधनकारक असताना कामगार आयुक्त पथकाने सदर कंपनीस केव्हा भेट दिली होती व त्या पाहणीमध्ये काय आढळून आले याबाबत अद्याप खुलासा झालेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ अखेरीस निदर्शनास येणे, त्यामुळे या दोन्ही बाबींसंबंधात अद्यापही कार्यवाही न झाल्याने जनतेमध्ये व कामगार वर्गांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याप्रकरणी शासनाने तातडीने मृतांच्या वारसांना आर्थिक मदतीच्या वितरणासह पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

## (सकाळी ११-३० ते दुपारी १-३० वाजेपर्यंत)

**राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला व शेवटचा दिवस)**

## (दुपारी २.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**तीन : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **सर्वश्री विलास पोतनीस, सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील दहिसर मध्ये सुरू असलेल्या अग्निशमन दलातील अग्निशामकांच्या भरती प्रक्रियेदरम्यान महिला अग्निशामक पदासाठी १६२ इंच उंचीच्या निकषात बसत असतानाही अनेक महिलांना डावलण्यात आल्यामुळे संतप्त झालेल्या आणि आंदोलनाचा पवित्रा घेतलेल्या महिला उमेदवारांवर बंदोबस्तासाठी ठेवण्यात आलेल्या पोलिसांनी सौम्य लाठीमार केला असल्याची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असणे, मुंबईतील अग्निशमन दलात ९०० जागांची भरती प्रक्रिया सुरु झाली असणे, दहिसर येथे भरतीसाठीच केंद्र उभारण्यात येणे, या ठिकाणी भरतीसाठी महिला उमेदवारांची मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळलेली असणे, अयोग्य नियोजनाचा फटका महिला उमेदवारांना बसणे, सदरहू भरती प्रक्रीयेकरीता मुलींसाठी १६२ सेमी उंचीची अट असणे, तरीदेखील १६२ सेंमी उंची पेक्षा जास्त उंची असलेल्या मुलींना सुद्धा भरती प्रक्रियेतून बाहेर काढण्यात येणे, परंतु १६२ सेमी पेक्षा कमी उंचीच्या मुलींना पात्र ठरवण्यात येणे, तसेच उशिरा आलेल्या काही मुलींना टोकन देऊन दुसऱ्या दिवशी बोलावण्यात येणे, परंतु दिलेल्या वेळेवर पोहोचून सुद्धा त्यांना भरती प्रक्रियेत प्रवेश न देण्यात येणे, त्यामुळे नाराज झालेल्या महिला उमेदवारांनी घेतलेला आंदोलनाचा आक्रमक पवित्रा आणि आंदोलनकर्त्या असहाय्य महिला उमेदवारांवर पोलिसांनी केलेला सौम्य लाठीमार, परिणामी सदरहू ठिकाणी अग्निशमन भरती प्रक्रियेसाठी जमलेल्या सर्व महिला उमेदवारांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू भरती प्रक्रियेस तात्काळ स्थगिती देऊन झालेल्या अनियमिततेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

**(२)** **श्रीमती उमा खापरे,** श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांनी जीवन संपवले असल्याने अनेक कुटुंबे रस्त्यावर येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, तत्कालीन गृहमंत्री यांनी राज्यातील सावकारी मोडीत काढण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली होती, मात्र आता पुन्हा एकदा सावकारांविरुद्ध पलूस तालुक्यात आणि राज्यात विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना पायबंद घालण्यासाठी आवश्यकता नागरिक व्यक्त करीत असणे, दुधोंडी येथील खाजगी सावकारांवर कुंडल पोलीस ठाण्यात सावकारीचा गुन्हा दाखल असतानाही पिडीताना धमकावले जात असतानाही शासनाचे दुर्लक्ष होणे, खाजगी सावकारांच्या अत्याचारातून शेतकऱ्याला न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(३)** **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मराठवाड्यातील ८ जिल्हयामध्ये जवळपास ८००० हेक्टर क्षेत्र तुती लागवडीखाली असून त्यापैकी २००० हेक्टर एकट्या जालना जिल्हयात असणे, तुतीची लागवड करण्यासाठी जालना, बीड, परभणी जिल्हयात उपयुक्त हवामान असल्याने मोठया प्रमाणावर शेतकरी तुतीची लागवड करीत असणे, कमी पाण्यात भक्कम उत्पादन आणि पैसा देणारे रेशीम शेतीत आता लहान शेतकरी मोठया प्रमाणावर रस घेत असणे, सन २०१० मध्ये जालना कृषि उत्पन्न बाजार समितीत रेशीम कोष बाजाराची स्थापना करण्यात आलेली असणे, मागील वर्षात जालना येथे किमान ८००० क्विंटल रेशीम कोषची खरेदी विक्री झाली असून जवळपास ५० कोटीची उलाढाल झालेली असणे, मागील वर्षीचा रेशीम कोष खरेदीचा दर सरासरी रु.७० हजार प्रति क्विंटल शेतकऱ्यांना मिळाला असणे, तसेच सन २०१८ मध्ये कर्नाटक राज्याच्या धरतीवर जालना येथे शासकीय रेशीम कोष खरेदी केंद्राची स्थापना करण्यात आली असणे, जालना येथे रेशीम कापड निर्मिती, हातमाग, यंत्रमाग इत्यादी सुरु करण्यासाठी मोठा वाव असणे, शेतकऱ्यांना रेशीम कोष उत्पादन व रेशीम उद्योगाबाबतीत नवनवीन तंत्रज्ञान मिळाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होणार असणे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठाची जालना येथे मोठया प्रमाणावर जमिन असल्याने तेथे त्यांचे कृषि तंत्र विद्यालय कार्यरत असणे, त्याचे बळकटीकरण करुन रेशीम महाविद्यालय स्थापन करणेकरिता वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने

अप्रकाशित प्रत

दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या कार्यकारणी परिषदेच्या बैठकीत ठराव घेऊन अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला असणे, जालना परिसरातील शेतकऱ्यांना व विद्यार्थ्यांना रेशीम शेती व रेशीम उद्योग क्षेत्राचे ज्ञान मिळण्यासाठी जालना येथे रेशीम महाविद्यालय स्थापन करण्याची होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **डॉ.प्रज्ञा सातव,** सर्वश्री अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हिंगोली जिल्हयात मोठया प्रमाणावर अवैध देशी-विदेशी दारुच्या व्यवसाय फोफावला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास येणे, येथील अवैध दारुविक्रीमुळे ग्रामीण भागात तंटे वाढत असणे, परिणामी गावस्तरावरील वातावरण दुषित बनत असणे, यातून गुन्हेगारी वाढत असणे, परंतू बीटस्तरावरील काही कर्मचारी वरिष्ठांच्या डोळयात धुळफेक करुन अवैध दारुविक्रीला संमती देत असल्याचे येथे चित्र असणे, ग्रामीण भागात विना नंबर दुचाकीवर देशी-विदेशी दारुचा थेट द्वारपोच पुरवठा केला जाणे, परंतू प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे येथील चिंचोली महादेवसह अनेक गावांतील महिला गावांत दारुबंदी करावी अशी आग्रही मागणी करीत असणे, मात्र त्यांच्यावरच प्रशासन खोटे गुन्हे दाखल करीत असणे, त्यामुळे शासनाने माहिती घेऊन येथील अवैध देशी-विदेशी दारुविक्रीला रोखून संबंधित विक्रेते व प्रशासनातील जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी सर्वच स्तरावरुन मागणी होत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**पाच : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

(२) "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ — महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३"

---

**सहा : (मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** सुरेश धस, प्रा.राम शिंदे, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, रामदास आंबटकर, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण पोटे-पाटील, वसंत खंडेलवाल, अमरीशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना दिरंगाई करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु. ४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही मागील सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे परंतू, त्याच वेळेस महायुती सरकारने माहे जून, २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज

अप्रकाशित

घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे परंतू, मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणाऱ्या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे परंतू, महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी आघाडी सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे परंतु, महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेद्वारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे परंतु, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्ह्या-जिल्ह्यांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रवीण दटके, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात नोकरी व शैक्षणिक आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) उमेदवारांना अनेक जाचक अटींचा सामना करावा

अप्रकाशित प्रत

लागत असणे, नोकरीकरीता व इतर आरक्षणाकरीता उमेदवारांना इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) असल्याच्या प्रमाणपत्रासोबतच नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र अत्यावश्यक केलेले असणे, शासनाच्या धोरणानुसार वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ८ लक्ष असल्याने व शासनाच्या नियमानुसार दर तीन वर्षांनी याबाबत आढावा घेऊन ही दरवाढ करणे आवश्यक असणे, परंतु मागील पाच वर्षात ही दरवाढ न झाल्याने अनेक पात्र इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) उमेदवार अपात्र होऊन त्यांचे शैक्षणिक व नोकरीविषयक नुकसान झालेले असणे, परिणामी इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) संवर्गाच्या कोटयातील हजारो पदे रिक्त असूनही या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व नोकरीचे आरक्षण हिरावले जात असणे, सातव्या वेतन आयोगामुळे व दरवाढ न झाल्यामुळे राज्यातील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांच्या पाल्यांनासुद्धा या लाभापासून वंचित राहावे लागत असणे, याबाबत असलेल्या जाचक अटीसंदर्भात योग्य तो निर्णय घेण्याची मागणी शासन स्तरावर प्रलंबित असणे, त्यानुषंगाने तातडीने याबाबत निर्णय घेण्यात येऊन इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) संवर्गातील उमेदवारांना न्याय देणेबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"मातृतिर्थ सिंदखेडराजा येथे जिजाऊ जन्मोत्सव सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही दि. १२ जानेवारी, २०२३ रोजी मोठया उत्साहाने साजरा होणे, दरवर्षी "मातृतिर्थ सिंदखेडराजा येथे जिजाऊ जन्मोत्सव सोहळयाकरिता महाराष्ट्र व शेजारील कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, गोवा या राज्यातून लाखो पर्यटक जिजाऊ जन्मोत्सव सिंदखेडराजा येथे येत असणे, पर्यटकांसाठी सदर ठिकाणी मुलभूत सोयी-सुविधा नसल्याने पर्यटकांची गैरसोय होत असणे, पर्यटकांना अनेक समस्यांना सामारे जावे लागत असणे, सदर पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी संपूर्ण परिसराचा विकास आराखडा तयार करुन मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता असणे, पर्यटनाच्या माध्यमातून येथे मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकेल व महाराष्ट्राच्या ऐतिहासिक अस्मितेचा वारसा सांगणारी जिजाऊ सृष्टी मातृतिर्थ सिंदखेडराजाचा विकास करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२३

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.